महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : दुसरे अंक : ९४ वा दिनांक : ०८/०१/२०२५ वार : बुधवार

## एकनाथ शिंदेंमुळे आपली युती फिसकटली : राज ठाकरेंच्या बैठकीत मनसे नेत्यांचा सूर



**मुंबई** : विधानसभा निवडणुकीत सुपडा साफ झाल्यानंतर आता महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने आता महापालिका निवडणुकांकडे लक्ष केंद्रीत केले आहे. राज ठाकरे यांनी आज शिवतीर्थ येथे मनसे पदाधिकाऱ्यांची बैठक बोलावली होती. या बैठकीत आगामी महानगरपालिका निवडणुकांसह विविध विषयांवर चर्चा झाली. एकनाथ शिंदे यांच्यामुळे मनसेची विधानसभेची युती फिसकटली, असा सूर मनसे नेत्यांनी लावल्याचे बैठकीत पाहायला मिळाले.

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी या बैठकीत मुंबई महापालिका निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेतला. तसेच विधानसभेला जे झाले ते विसरून महानगरपालिका निवडणुकीच्या तयारी लागा, असे आदेश पदाधिकाऱ्यांना दिले आहेत. यासोबतच महापालिका निवडणुकांमध्ये महायुतीसोबत जाण्याबाबतही चर्चा करण्यात आली.

आगामी महानगरपालिका निवडणुकीत कोणत्या राजकीय पक्षाशी युती करायची, याची चर्चा झाली. युतीबाबतच्या चर्चा होतील, मात्र अंतिम निर्णय राज ठाकरे घेतील, असे संदीप देशपांडे यांनी सांगितले. दोन्ही ठाकरे बंधुंनी एकत्र यावे, अशी मीडियात चर्चा आहे. विधानसभेत युती का झाली नाही? त्यावेळी काय चर्चा झाल्या? कशामुळे नुकसान झाले? याचा आढावा मनसेच्या आजच्या बैठकीत घेण्यात आला, असे संदीप देशपांडे यांनी सांगितले.

दरम्यान, विधानसभेची युती एकनाथ शिंदे यांच्यामुळे फिसकटली, असा सूर मनसेच्या नेत्यांकडून बैठकीत बघायला मिळाला. एकनाथ शिंदे यांच्यामुळेच आपण महायुतीत गेलो नाही, असे मत काही नेत्यांनी बैठकीत मांडले. एकनाथ शिंदे यांच्यामुळेच आपल्याला फटका बसल्याचेही काही नेत्यांनी सांगितले, अशी माहिती आहे.

राज ठाकरे यांचे पुत्र अमित ठाकरे यांचा माहीम विधानसभा मतदारसंघातून पराभव झाला. त्यांना पाठिंबा देण्यावरून झालेल्या वादामुळे शिंदे गटाचे तत्कालीन आमदार सदा सरवणकर नाराज झाल्याचे पाहायला मिळाले होते. यावरून मनसे आणि शिंदे गटात मतभेद निर्माण झाल्याचे दिसून आले होते.

## बीडचे राजकीय पर्यावरण लवकरच बदलेल:मंत्री पंकजा मुंडे

**बीड** : राज्याच्या पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी बीडचे राजकीय पर्यावरण लवकरच दुरुस्त होणार असल्याचे महत्त्वपूर्ण विधान केले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार हे दोघे मिळून बीडमधील परिस्थिती सुधारतील. त्यानंतर तेथील राजकीय पर्यावरण लवकरच बदलेल, असे त्या म्हणाल्यात. त्यांच्या या विधानाचे विविध अर्थ काढले जात आहेत. दरम्यान, पंकजा यांनी यावेळी मंत्री धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्यावर भाष्य करण्यासही नकार दिला.

भाजप आमदार सुरेश धस यांनी मंगळवारी एकेठिकाणी बोलताना सरपंच संतोष देशमुख हत्याकांडावरून पंकजा मुंडेंवर निशाणा साधला होता. पंकजा मुंडे या प्रकरणात धनंजय मुंडे यांना पाठिशी घालत असल्याचा आरोप त्यांनी केला होता. पंकजा मुंडे यांनी येथे आयोजित एका पत्रकार परिषदेत त्यांच्या या टीकेला प्रत्युत्तर दिले.

पंकजा म्हणाल्या, मी माझ्या छोट्या लेव्हलच्या विषयांना हाताळते. माझ्यापेक्षा मोठा अभ्यास असणाऱ्या लोकांच्या विषयांवर मी उत्तर देऊ शकत नाही. प्रस्तुत प्रकरणात महाराष्ट्रात सर्वप्रथम मीच एसआयटी लावण्याची मागणी केली होती. यासंबंधी मुख्यमंत्र्यांना लिहिलेल्या पत्राची कॉपी मी तुम्हाला देऊ शकते. त्याचबरोबर मी वेळोवेळी माझी भूमिका विषद केली. एसआयटी लावण्याची मागणी केली. नागपूरमध्ये मी याविषयावर बोलले.

पंकजा मुंडे यांनी यावेळी बीडमधील अधिकारी मी एकटीने आणले आहेत का? असा सवालही उपस्थित केला. त्या म्हणाल्या, बीडमधील अधिकारी मी आणले आहेत का? तत्कालीन मुख्यमंत्री, पालकमंत्री हे अधिकारी आणले.

संतोष देशमुख हा माझा कार्यकर्ता होता. त्यांच्या लेकरांचा चेहरा बघून मला काय वाटते? हे मला तुम्हाला सांगण्याची गरज वाटत नाही. त्याचे जाहीर प्रदर्शन करण्याचीही गरज नाही. कोण अधिकारी कुणाचे, ते कुठून आणले? हा प्रश्न नाही. हे अधिकारी मी आणले का? तत्कालीन मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, पालकमंत्री व तत्कालीन यंत्रणेने हे अधिकारी आणले. ते सर्वजण आता या प्रकरणी चौकशीची मागणी करत आहेत. योग्य माणसाला शिक्षा झाली पाहिजे.

आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार हे दोघे मिळून बीडमधील स्थिती सुधारतील असे वाटते. या प्रकरणी माझी त्यांना सर्वस्वी साथ राहील. बीडमधील स्थिती बिघडली असे म्हणण्यास माझे मन जड होते. कारण, मी राज्यभरातील घटनांचा आढावा घेते. त्यावर आपण नंतर केव्हातरी बोलू. पण ते बिघडवण्याचा कुणी प्रयत्न करत असेल तर त्यांना पाठिशी घालण्याचा प्रकार होऊ नये अशी माझी इच्छा आहे.

पंकजा मुंडे यांनी यावेळी मंत्री धनंजय मुंडे यांच्या संभाव्य राजीनाम्यावर भाष्य करण्यासही नकार दिला. त्या म्हणाल्या, धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्यावर मी उत्तर देऊ शकत नाही. या प्रकरणी त्यांच्या पक्षाचे नेते व या राज्याचे मुख्यमंत्री हे दोघेच उत्तर देऊ शकतात. मी प्रोटोकॉलवाइज फार लहान आहे. मंत्री असल्यामुळे मी कोणत्याही विषयाला थेटपणे उत्तर देऊ शकत नाही, असे त्या म्हणाल्या.

## महाराष्ट्रात राबविले जाणार 'ई - कॅबिनेट'

**मुंबई** : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्य शासनाच्या कारभारात जास्तीत जास्त तंत्रज्ञानाचा वापर करून पारदर्शकता आणि गतीमानता आणण्यावर भर दिला असून त्याचाच एक भाग म्हणून ई-कॅबिनेटचा निर्णय घेतला आहे. NIC ने विकसित केलेल्या ई-कॅबिनेट ह्या प्रणालीचे सादरीकरण आज मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी मंत्रिमंडळ बैठकीत केले.

मंत्रिमंडळ बैठकीसाठी कागदांचा मोठ्या प्रमाणावर होणारा वापर कमी करण्यासाठी हे संपूर्ण आयसीटी (ICT) सोल्यूशन महत्त्वपूर्ण ठरणार आहे. या प्रणालीमुळे मंत्र्यांसाठी अत्यंत सुलभ डॅशबोर्ड उपलब्ध होईल. त्याचबरोबर आवश्यक संदर्भ शोधणे, कृती बिंदू (ॲक्शन पॉइंट) पाहणे आणि घेतलेल्या निर्णयांच्या अंमलबजावणीबाबत पुनरावलोकन करणे सोपे होईल.

ई-कॅबिनेटमुळे मंत्रिमंडळ बैठकांचे, निर्णयांचे व त्यासंबंधीच्या दस्तऐवजांचे जतन होईल. मंत्रिमंडळ निर्णय आणि त्यासंबंधीचे संदर्भ शोधणे सहज शक्य होईल. आतापर्यंत होत आलेल्या पारंपरिक मंत्रिमंडळ बैठकांमध्ये येणाऱ्या विविध अडचणींवर या प्रणालीमुळे मात करता येईल.

मंत्रिमंडळासमोर सादर करण्यात येणारे प्रस्ताव ऑनलाईन अपलोड करणे, तो मंत्रिमंडळासमोर चर्चेसाठी आणि निर्णयासाठी सादर करणे, त्यावर अंतिम निर्णय व त्याबाबतच्या सर्व नोंदी ठेवणे ह्या सर्व प्रक्रिया सहजरित्या पार पडणार आहेत. हा सुशासनाच्या पूर्ततेतील एक महत्त्वाचा टप्पा आहे. या प्रणालीमुळे मंत्रिमंडळाच्या बैठकीसाठी कागदपत्रांच्या वितरणासाठी शेवटच्या क्षणी होणारी धावपळ टळून या प्रक्रियेतील अधिकारी-कर्मचाऱ्यांचा तसेच मंत्रिमंडळाचा मोठा वेळ वाचणार आहे.

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स अ‍ॅण्ड प्रिंटर्स
डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.
मो. 8087880274, 8956362639, 9270446603, 9405109103
डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)
- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर
अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.
Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०८ जानेवारी २०२५


## कन्नड तालुका पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी विठ्ठल शिरसे



**कन्नड (अरुण थोरात) :** बाळासाहेब पवार सा.वाचनालय कन्नड येथे तालुका पत्रकार संघाच्या वतीने दि. ६ जानेवारी रोजी आद्य पत्रकार 'दर्पणकार 'श्री बाळशास्त्री जांभेकर यांना अभिवादन करत दर्पणदिन साजरा करण्यात आला. यावेळी जेष्ठ पत्रकार डॉ. यशवंत पवार यांच्या अध्यक्षते खाली संपन्न झालेल्या बैठकीत पत्रकार संघाची नूतन कार्यकारिणी निवडण्यात आली. त्यानूसार अध्यक्षपदी विठ्ठल शिरसे(दै.प्रसार) यांची तर सचिवपदी मुजीब खान(आपलं महानगर) यांची बिनविरोध निवड करण्यात आली. पत्रकार संघाची उर्वरित कार्यकारिणीत उपाध्यक्ष - डी. यशवंत पवार ( दै.शूर मराठा), कार्याध्यक्ष - प्रा.डॉ. शिवाजी हुसे (पत्रकार दै.दखनी स्वराज्य, संपादक त्रै.मा. तिफण), सहसचिव - किशोर क्षिरसागर (दै. दिव्य मराठी) यांच्यासह अभिषेक देशमुख, आर.एस. पवार, मधु महाले (संपादक दै. शिवणातीर), शेख अकीब, संजय जाधव यांची सदस्यपदी निवड करण्यात आली आहे. कार्यक्रमाच्या सुरुवातीस सहकारमहर्षी बाळासाहेब पवार, ज्येष्ठ पत्रकार स्व. सुरेश केवट आणि आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या वेळी डॉ. यशवंत पवार यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तिफणकार डॉ. शिवाजी हुसे यांनी केले. सावित्रीबाई फुले कन्या विद्यालयाचे प्राचार्य संजय जाधव यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करून उपस्थितांचे आभार मानले.कार्यक्रमास बाळासाहेब पवार सार्वजनिक वाचनालयाचे सचिव रामकृष्ण पवार, संजय केवट आदी उपस्थिती होते.

## कन्नड तालुका पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी संतोष निकम



**कन्नड (अरुण थोरात) :** मराठी भाषेतील आद्य पत्रकार आणि दर्पण या मराठी वृत्तपत्राचे संस्थापक आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांची जंयती दर्पण दिन म्हणून कन्नड तालुका पत्रकार संघाच्या वतीने शहरातील कन्नड पत्रकार संघाच्या कार्यालयात दि.06 जानेवारी रोजी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी कन्नड तालुका पत्रकार संघाची नूतन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. कन्नड तालुका पत्रकार संघाच्या वतीने अध्यक्षपदी दैनिक सकाळचे कन्नड तालुका बातमीदार संतोष निकम, उपाध्यक्षपदी रेहान शेख, मधु महाले, सचिवपदी सागर पाटील यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. सुरुवातीस आचार्य बाळशास्त्री जांभेकर, भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुजन कन्नड पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष तथा जेष्ठ पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष सुरेश चव्हाण, माजी उपाध्यक्ष विजयकुमार मांडे, माजी सचिव कल्याण पाटील, भास्कर पाटील, संजय मुचक, डॉ. सदाशिव पाटील, अंकुश निकम, अनिल शिरसाठ, प्रमोद सोनवणे, याकुब शेख यांच्या हस्ते करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली.

यावेळी विजयकुमार मांडे, डॉ. सदाशिव पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सागर पाटील यांनी सुत्रसंचालन केले तर मधु महाले यांनी आभार मानले.

## इलेक्ट्रोनिक माध्यम युगात ही पत्रकारीता टिकून




**कन्नड (अरुण थोरात) :** सोशल मिडीया व इलेक्ट्रोनिक मिडीयाच्या आधूनिक युगात ही प्रिंट मिडीया टिकून आहे. स्वातंत्र्य नंतर च्या काळात ही पत्रकारांनी आपले समाज कार्य सुरुच ठेवल्याचे मत कन्नड उपविभागीय अधिकारी संतोष गोरड यांनी व्यक्त केले आहे. ते दि. ६ जानेवारी रोजी शिवाजी महाविद्यालय कन्नड येथे पत्रकार दिना निमित्त आयोजित कार्यक्रम प्रसंगी बोलत होते. पत्रकार दिना निमित्त 'दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. प्रमुख अतिथी म्हणून उपविभागीय अधिकारी संतोष गोरड उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. रामचंद्र झाडे यांनी केले. स्वातंत्र्य लढ्यात जनजागृती व प्रबोधनाचे मोठे काम पत्रकारांनी केले. अनेक अन्याय, अत्याचार होऊन ही आज पर्यंत पत्रकारिता टिकून आहे. याचे श्रेय पत्रकारांना जाते. असेही श्री गोरड यांनी मनोगतातून सांगितले, प्राचार्य डॉ. विजय भोसले यांनी मार्गदर्शन पर सांगितले की, कन्नड तालुक्यातील बहुतांश पत्रकार मंडळी ही आपले माजी विद्यार्थी असल्याने आम्हाला अभिमान वाटतो. महाविद्यालयात शिक्षण घेऊन बाहेर पडलेले असंख्य विद्यार्थी वेगवेगळ्या क्षेत्रात उंचीवर पोहचली आहे. पत्रकारिता क्षेत्रात ही मंडळी समाज प्रबोधन, अन्याय ला वाचा फोडत न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न करीत आहेत. नवतरुणांनी ही या क्षेत्रात करियर करावे असे अवाहन प्राचार्य भोसले यानी केले. यावेळी पत्रकार संघाचे अध्यक्ष संतोष निकम, विठ्ठल शिरसे, जेष्ठ पत्रकार मधू महाले, अनिल शिरसाठ, सहयोग जावळे यांनी मनोगत व्यक्त करित विद्यार्थ्यांनी पत्रकारिता क्षेत्रात करियर करण्याचे अवाहन केले. कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते पत्रकारांचा सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक डॉ रामचंद्र झाडे, सुत्रसंचालन तिफणकार डॉ. शिवाजी हुसे यांनी केले, यावेळी तालुका पत्रकार संघांच्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी संस्थेचे संचालक चंद्रकांत देशमुख, प्रा. प्रकाश खेत्री, प्रा. कारभारी भानुसे, पत्रकार संजय जाधव, जेष्ठ पत्रकार डॉ. यशवंत पवार, सुरेश चव्हाण, भास्कर पाटील, कल्याण पाटील, उपाध्यक्ष रेहान शेख, इलीयास शेख, सहयोग जावळे, सुनील गोसावी, प्रविण जंजाळ, रविंद्र अजमेरा, अंकुश निकम, गोरख पाटील, अरुण थोरात, किशोर क्षीरसागर, अभिषेक देशमुख, संजय काळे, निलेश पवार, अनिल शिरसाठ आदि सह पत्रकार उपस्थितीत होते.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०८ जानेवारी २०२५


## "विद्यार्थ्यांसह पालक शिक्षकांतही सायबर सुरक्षा जागृती महत्वाची"



**कन्नड (अरुण थोरात) :** शालेय विद्यार्थ्यांनी अभ्यास आणि खेळ या दोनच बाबींवर आपले लक्ष केंद्रित केले तर जीवनात कोणत्याही प्रकारच्या कठीणतल्या कठीण परिस्थितीला ते सामोरे जाऊन अवकाशाला गवसनी घालू शकतात.मात्र त्याच सोबत आता सायबर सुरक्षा बाबत विद्यार्थ्यांसह पालक आणि शिक्षकांतही जागृती असणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन कन्नड शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक आर.बी. सानप यांनी दि.०६ जानेवारी रोजी अंधानेर प्रशालेत केले.

पोलीस अधिक्षक कार्यालय व पोलीस ठाणे कन्नड शहर यांच्या वतीने पोलीस स्थापना दिवसाचे अनुषंगाने इयत्ता आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी विद्यार्थामध्ये सायबर सुरक्षा संदर्भात जनजागृती होण्याचे दृष्टीकोनातुन सायबर सुरक्षा जिल्हयास्तरीय स्पर्धा परिक्ष व मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर बोलत होते. यावेळी प्रशालेचे मुख्याध्यापक राजीव जाधव, सपोनी. चांद मेंढके, पोकॉ. संजय आटोळे, गुप्त वार्ता चे प्रदीप चव्हाण, पोकॉ दिनेश खेडकर यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रस्ताविक तसेच सूत्रसंचल संजय केवट यांनी केले. सपोनि चांद मेंढके यांनी विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षितात यावर मार्गदर्शन केले. या स्पर्धा परिक्षेचा मुख्य विषय हा सोशल मिडीया व्हॉट्सअॅप, फेसबुक, इंस्टाग्राम, ऑनलाईन गेम यांच्या माध्यमांतुन होणारी फसवणूक, तसेच सोशल मिडीयाचा सवयी (अॅडीकशेन) यावर आधारित होती यामाध्यमांतुन शालेय स्तरावरिल विद्यार्थी, पालक तसेच शिक्षक यांचे मध्ये जनजागृती होवुन मुले असे सायबर धोक्यापासुन वेळीच सावध होवुन कोणत्याही सायबर प्रलोभनास बळी पडणार नाही तसेच त्याचे अधीन जावुन स्वत:चा जिव धोक्यात घालणार नाहीत.

या स्पर्धा परिक्षेत ग्रामीण सहभागी विद्यार्थ्यांना सायबर विषयावर विस्तृत माहिती होवुन मुलांना सायबर तसेच सोशल मिडीयाचा याचा वापर, त्याद्वारे होणारी फसवणूक व फसवणूकीचे प्रकार याचे अद्यावत ज्ञान होईल या उद्देशाने उपक्रम राबविण्यात आला. प्रथम,द्वितीय, तृतीयअसे विद्यार्थ्यांचे गुणवत्तेनुसार गुणांकन करण्यात येणार असुन त्यांना पोलीस अधीक्षक कार्यालयाकडुन प्रमाणपत्र, ट्राफी, असे पारितोषिक प्रदान करण्यात येणार आहेत. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रशालेचे आर सी पाटील, एन एच दांगट, मच्छिन्द्र डिघोळे, दिपक सोनवणे, सतीश कापुरे, रामभाऊ गुढेकर, सुयश अहिरराव, जावेद पटेल, रुपाली सोनवणे, मीनाक्षी बडग, आरती बागुल, सीमा बोडखे, शामकांत येवले, योगेश जाधव, भागीनाथ भडांगे, शेख अष्पाक आदींनी परिश्रम घेतले. आभार दिपक सोनवणे यांनी मानले.

## जे ई एस महाविद्यालयातर्फे युवा जल्लोष निमित्त जालना शहरात मशाल रॅली






**जालना (प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे)** जे ई एस महाविद्यालय जालना तर्फे महाविद्यालयातील युवकांसाठी आयोजीत 'युवा जल्लोष-२०२५' महोत्सवानिमित्त युवकांमध्ये चैतन्याचे व खेळाडू प्रवृत्तीचे वातावरण निर्मितीसाठी महाविद्यालयातील युवक-युवती साठी दि.६ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ठीक ८.०० वाजता जेईएस महाविद्यालयाच्या क्रीडांगणावरून मशाल रॅली निघाली असून, झाशीची राणी पुतळा, शिवाजी पुतळा,बडी सडक, कॉलेज रोड मार्गे भारत माता की जय, वंदे मातरम्, घोषणा देत, रॅलीचे विसर्जन महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री यांच्या उपस्थितीत झाले.

यावेळी प्राचार्य डॉ. अग्निहोत्री यांनी युवकांना मार्गदर्शन केले. या रॅलीत जेईएस महाविद्यालयातील युवक-युवती तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते, उपप्राचार्य प्रा. डॉ. महावीर सदावर्ते व प्रा. प्रवीण बाफना, पर्यवेक्षिका प्रा. करुणा वासनिक, पर्यवेक्षक डॉ. सुमंत बिक्कड क्रीडा विभाग प्रमुख प्रा. डॉ. हेमंत वर्मा तसेच युवा जल्लोष सांस्कृतिक कार्यक्रमाचे प्रमुख प्रा. डॉ. गणेश कुलकर्णी , राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे, प्रा. डॉ. राजेश सरकटे, प्रा. योगेश लहामाटे, प्रा. किशोर तापडिया, राष्ट्रीय छात्र सेना प्रमुख डॉ. कॅप्टन फुलचंद मोहिते, डॉ. नागनाथ शेवाळे आदी उपस्थित होते.

## शिक्षणमहर्षी तात्याराव मोरे आंतरमहाविद्यालयीन वादविवाद स्पर्धेचे आयोजन



शिक्षणमहर्षी
कै.तात्यारावजी माधवरावजी मोरे (आबा)
संस्थापक व चिटणीस:- भारत शिक्षण संस्था,उमरगा
कार्यकाल :- जुलै 1941 ते एप्रिल 1979

**उमरगा :** भारत शिक्षण संस्थेचे संस्थापक चिटणीस शिक्षण महर्षी (कै) तात्याराव मोरे यांच्या स्मरणार्थश्री छत्रपती शिवाजीमहाविद्यालयात शुक्रवारी (दि.१०) आंतर महाविद्यालयीन वादविवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. शहरातील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात स्वातंत्र पुर्व काळातील भारतशिक्षण संस्थेचे संस्थापक चिटणीस शिक्षण महर्षी कैतात्याराव मोरे यांच्या स्मरणार्थ गेल्या ३९ वर्षापासून दरवर्षी एका ज्वलंत विषयावर वाद-विवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. विद्यार्थ्यामधील वक्तृत्व व नेतृत्व गुण विकसित करण्याच्या हेतूने तसेच विद्यार्थ्यात सामाजिक प्रश्नाची जाण व्हावी त्यांच्यातील विचार मंथना लागती मिळावी या उद्देशाने संस्थेच्या रौप्य महोत्सवी वर्षे सन १९८४ पासून दरवर्षी शिक्षण महर्षी तात्याराव मोरे आंतर महाविद्यालयीन वाद-विवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. यंदा वादविवाद स्पर्धेचे ४० वे वर्ष असल्याने एका ज्वलंत विषयावर स्पर्धा घेण्यात येत आहे.

एका बाजूला भारतात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० लागू करण्यात आलेले आहे. या शैक्षणिक धोरणानुसार विद्यार्थ्यांमध्ये कौशल्य गुण विकसित व्हावेत या उद्देशाने नवीन अभ्यासक्रमाची रचनाही करण्यात आलेली आहे. परंतु ज्यांच्यासाठी हे धोरण आहे त्या विद्यार्थ्यांची वर्गातील वाढती अनुपस्थिती हा सध्या चिंतेचा विषय आहे. याच विषयावर विचार मंथन करण्याच्या उद्देशाने तरुणाईलाच बोलते करण्यासाठी 'वर्गातील वाढती अनुपस्थिती विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला मारक आहे नाही' या विषयावर हीस्पर्धा होणार आहे.

धाराशिव, लातूर, बीड व सोलापूर जिल्हयातील कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील प्रत्येकी एका संघास सहभाग घेता येणार आहे. संघात दोन स्पर्धकाचा समावेश असेल, यातील एकाने विषयाच्या अनुकूल तर दुसऱ्याला प्रतिकूल बाजु मांडता येईल. स्पर्धेत प्रथम येणाऱ्या संघास दहा हजार एक रुपये, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र, द्वितीय येणाऱ्या संघाससात हजार एक रुपये, स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र, तृतीय संघास पाच हजार एक रुपये, याशिवाय कनिष्ठ महाविद्यालय संघासाठी उत्तेजनार्थ तीन हजारएक रुपये, प्रमाणपत्र देण्यात येणार आहेत. तरी स्पर्धेत जास्तीत जास्त महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवावा असे आवाहन प्राचार्य डॉ . संजय अस्वले आणि संयोजन समितीने केले आहे.